**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४०/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश**
(पारीत दिनांक - ३०.०३.२०२६)

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार रमेश शिवाजी राठोड, रा. भोसगा तांडा, पो. मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि.सोलापूर यांनी त्यांच्या मालकीचे जप्त असलेली HERO HONDA MOTORS LTD कंपनीची SPLENDOR PRO मोटरसायकल जिचा नोंदणी क्रमांक MH-13/BB-2812 चेसिस क्रमांक MBLHA10ADBHHO5102 इंजिन क्रमांक HA10EHBHH06447 ही सुप्रतनाम्यावर मिळण्याकरीता सादर केला आहे.

०२. अर्जदार यांनी सादर केले आहे की, त्यांचे वर नमुद वाहन हे अक्कलकोट दक्षिण पोलीसांनी गु.र.क्र.२९/२०२६ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ए), ६५(इ) अन्वये जप्त केला असून सदरचे वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असून दैनंदिन वापरात ते आणतात. त्यांना त्या वाहनाचा ताबा न मिळाल्यास त्यांचे नुकसान होईल. त्यामुळे त्यांना त्या वाहनाचा सुप्रतनाम्यावर तात्पुरता ताबा देण्यात यावा अशी विनंती केली.

०३. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक ०५ वर दाखल केले असून उपरोक्त नमूद वाहन क्रमांक असलेली मोटरसायकल त्यांनी सदर गुन्हयात जप्त असून सदरचे वाहन हे पुन्हा अशाच प्रकारच्या गुन्हयात वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच वाहनात बदल करुन विक्री करण्याची शक्यता असल्याने वाहन अर्जदारास परत देण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे. सरकारी अभियोक्ता यांनी देखील निशाणी क्रमांक ०५ च्या मलपृष्ठावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

०४. अर्जाचे, उत्तरांचे आणि दस्ताऐवजांचे अवलोकन केले. अर्जदार यांनी स्वतःच्या आधार कार्डची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. त्यात तो नमूद

ठिकाणचा रहिवासी असल्याचे निदर्शनास येते. अर्जदाराने दाखल केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्राच्या पडताळणी केलेली प्रतीचे अवलोकन करता नमुद वाहन हे अर्जदाराच्या नावे मालक म्हणून दर्ज असल्याचे आढळते. त्यामुळे, अर्जदार हा जप्त केलेल्या वाहनाचा मालक असल्याचे प्राथमिकदृष्ट्या निष्पन्न होते. अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणीही जप्त केलेल्या वाहनाबाबत हक्क प्रस्थापीत केलेला नाही व अर्जदाराच्या हक्काला आक्षेप वा ऊजर नोंदविलेला नाही. अर्जदाराने सदर वाहनावर त्याचा हक्क सिद्ध केल्याने तो अंतरीमरित्या त्या वाहनाच्या ताब्यास पात्र ठरतो. अर्जदाराचा अर्ज खालील आदेशाप्रमाणे निकाली काढण्यात येतो :-

## आ दे श

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येते.

२. अर्जदार रमेश शिवाजी राठोड, रा. भोसगा तांडा, पो. मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि.सोलापूर हा त्याच्या मालकीची जप्त असलेली HERO HONDA MOTORS LTD कंपनीची SPLENDOR PRO मोटरसायकल जिचा नोंदणी क्रमांक MH-13/BB-2812 चेसिस क्रमांक MBLHA10ADBHHO5102 इंजिन क्रमांक HA10EHBHH06447 ही सुप्रतनाम्यावर अंतरीमरित्या मिळण्यास पात्र आहे व त्याला वर नमुद चेसिस आणि इंजिन क्रमांकाच्या तपासणी नंतर वाहन ताब्यात द्यावे.

३. अर्जदार रमेश शिवाजी राठोड, यांनी सदर वाहन मिळाल्यानंतर त्या वाहनाच्या रंगात व स्वरुपात कुठलाही बदल करणार नाही, ते वाहन हस्तांतरण करणार नाही, कुठल्याही गुन्हयात वापरणार नाही व आदेशान्वये ते वाहन न्यायालयासमक्ष प्रस्तुत करेल अशी हमी घेवून त्याबाबत हमीपत्र (Indemnity Bond) रुपये १,५०,०००/- दाखल करेल. अर्जदार हा अर्ज निकाली काढण्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत वाहनाचा विमा दाखल करेल.

४. अर्जदाराने जप्त असलेल्या वाहनाचा चहुबाजुंनी छायाचित्र स्वखर्चाने गैरअर्जदारांना काढून दयावे व गैरअर्जदाराने ते दोषारोपपत्रासोबत दाखल

करावे.

५. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येतो आणि प्रस्तुत प्रकरणातील सर्व दस्ताऐवज हे दोषारोपपत्राबरोबर जोडण्यात यावे.

MUKUL MUKUND KALYANKAR

Digitally signed by MUKUL MUKUND KALYANKAR
Date: 2026.03.30 16:55:49 +0530

(एम.एम. कल्याणकर)
न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी)
न्यायालय क्र.१, अक्कलकोट.

दिनांक :- ३०.०३.२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.S.Mitragotri (Grade-III). |
| Court | : | Judicial Magistrate First Class, Akkalkot. |
| Date | : | 30.03.2026 |
| Judgment / Order signed by P. O. on | : | 30.03.2026 |
| Judgment / Order uploaded on | : | 31.03.2026 |